Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# नागपूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी (प्रारंभापासून ते 1730 पर्यंत)

**आनंद पि. मेश्राम,** संशोधक विद्यार्थी, शिवाजी महाविद्यालय गडचिरोली
**डॉ. कैलास आर. भांडारकर,** मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय गडचिरोली

**प्रस्तावना**

नागपूरच्या इतिहासाला प्राचीन असे वैभव आहे. प्रागैतिहासिक काळापासून नागपूर तथा परिसरामध्ये मानवाने वस्ती केलेली दिसून येते. पुरापासून काळापासून ते बृहदास्म ताम्र पाषाण कलापर्यंतची अवशेष नागपुर तथा परिसरामध्ये संशोधनातून आढळली आहेत. ऐतिहासिक काळामध्ये मौर्य यांच्या राजवटीच्या खानाखुणा या भागात दिसून येतात. त्यानंतरच्या राजवटीमध्ये सातवाहन, वाकाटक, कलचूरी, बादामीचे चालूक्य, राष्ट्रकूट कल्यार्निचे चालुक्य, देवगिरीचे यादव इत्यादींनी या प्रदेशात राज्य करीत या क्षेत्रातील सामाजिक सांस्कृतिक जीवन प्रभावित केलेले आहे. देवगडच्या गोंडानी आणि नागपूरच्या भोसल्यांनी अनेक वर्ष नागपूर आणि राज्य केले. नागपूरची ऐतिहासिक पायाभरणी करण्याचे श्रेय नागपूरवर राज्य करणाऱ्या गोंड आणि भोसले राजवटीला जाते.या सर्वांची केली या सर्व राजवटीची माहिती घेत नागपूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी प्रस्तुत शोध पत्रातून विषद करीत आहे.

**नागपूरचे नाव**

या शहराला नागपूर हे नाव केव्हा व कसे पडले हे निश्चित सांगता येत नाही. या परिसरामध्ये नाग जातीचे लोक राहत असल्यामुळे त्यांच्या नावावरून नागपूर हे नाव पडले असावे तसेच या क्षेत्रातून वाहणाऱ्या नदीला सुद्धा नाग जातींच्या लोकांवरून नाग नदी असे नाव पडले.नाग जाती ह्या आणि त्यांचे वंशज आसाम व अंदमानात आहेत. कुशाण राजवटी नंतर बुंदेलखंडात भारशिव नाग हे राजे झाले. पुढे यांनी वाकाटकांशी विवाहिक संबंध जोडले. नागपूर, नंदिवर्धन, नगवर्धन ही गावे नाग राजांनीच वसवली होती. उत्तरेत कुशानांचे साम्राज्य प्रस्थपित झाल्यानंतर नागवंशीय राजांनी इ स ८० ते १७५ या काळात या प्रदेशात येऊन वस्ती केली.[1]

हे नागवंशीय लोक बुद्धाचे अनुयायी होते. त्यांनी बुद्ध धम्माचा प्रसार केला. नागांची नागभूमी असलेल्या नागपूर भागात हे लोक मोठ्या संख्येने स्थायिक झाले होते. यांच्या नावावरून नागपूर हे नाव पडले. आणि या परिसरातून वाहणारी नदी नाग नदी म्हणून ओळखली जाऊ लागली.[2]

गोंड राजा बख्त बुलंद याने राजापूर बारसा नावाच्या बारा वाड्या एकत्रित करून नागपूर शहर वसविले. नागपूरची पायाभरणी करून त्यानेच नागपूर हे नाव कायम केले.[3]

**प्रागैतिहासिक नागपूर**

पुरापाषाण काळापासून नागपूर आणि परिसरामध्ये मानवी वस्ती असल्याचे अनेक साक्ष अलीकडच्या संशोधनातून प्राप्त झाले आहेत. नागपूर जिल्ह्यातील नद्यांच्या खोऱ्यात या युगाची अनेक स्थळे मिळाले आहेत.[4]

माहूरझरी, हिंगणा, जुनापाणी, भागीमाहरी, नेकुंठ, रायपूर हिंगणा या ठिकाणी तत्कालीन मानवी वस्तीचे अवशेष मिळाले आहेत. खुद्द नागपूर शहरातील अंबाझरी, फुटाळा, तेलंखेडी, गोरेवाडा तलाव सेमीनरि हिल्स आणि विद्यापीठ परिसरात दत्तवाडी पर्यंत पुरापासून काळातील विविध प्रकारची अवजारे प्राप्त झाकेली


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

आहेत.[5] नागपूर जवळील कुही तालुक्यातील अडम येथे प्राप्त अवशेष हे मध्य काळापासून ते सातवाहन काळापर्यंतच्या मानवी वस्तीचे ठोस पुरावे आहेत.[6] नागपूर जिल्ह्यामध्ये तामराश्मयुगाचे बृहदास्म युगात संक्रमण झाल्यानंतर लोखंडाचा आविष्कार होऊन शेतीची प्रगती झाली. शेतीसाठी जमिनी तयार करण्यात आल्या. टाकळघाट, नायकुंड, भगीमाहरी येथील संशोधनातून दफना व्यतिरिक्त लोहबृहदास्म संस्कृतीतील लोकांच्या वसाहतीचे अवशेष मिळाली आहेत. रात्र अवशेष आणि संशोधनातून नागपूर जिल्ह्यात आता आजूबाजूच्या परिसरामध्ये मानवी वस्ती होते असे दिसून येते पुरातत्त्विक दृष्टीने नागपूर जिल्ह्याची प्रागैतिहासिकता ही पाषाण युगापर्यंत गेलेली आढळून येते.

**मौर्यकाळातील नागपूर प्रदेश**

मौर्य पूर्वीच्या नंदराजाने भारताचा बराचसा भाग आपल्या साम्राज्यात आणला होता. त्यांनी दक्षिण महाराष्ट्रापर्यंतच्या प्रदेशात आपले प्रभुत्व निर्माण केले होते. नंद नावाची अनेक गावे नागपूर भागात आहेत. मौर्य साम्राज्याचे संस्थापक चंद्रगुप्त मौर्यचे नागपूर भागात प्रभुत्व होते हे सांगणे साधना अभावी अस्पष्ट असले तरी यांच्या साम्राज्यात भारताच्या दक्षिण भागाचा समावेश होता. यांच्या खाणाखुणा आढळून येतात.विदर्भ नागपूर भागातील चंद्रपूर जिल्ह्यात देवट्क आणि घुगुस येथे अशोकाचे दोन शिलालेख मिळाले आहेत.[8]

**शुंग साम्राज्य**

मौर्य नंतर मौर्याचा सेनापती पुष्पमित्र शुंग याने शेवटचा मौर्य सम्राट बृहद्रथाची हत्या करून शून्य साम्राज्याची स्थापना केली. शृंगाच्या साम्राज्यात विदर्भ प्रदेशाचा अंतर्भाव होता असे कालिदासाच्या मालवीकाग्नीमित्र नाटकातून दिसून येते.[9] विदर्भाचा प्रदेश सुमारे इसवी सन 140 पर्यंत शुंगाच्या सत्तेखाली होता.यानंतरच्या जवळपास एका शतकाच्या इतिहासाची माहिती मिळत नाही.[10] लेखयुक्त टंकित नाण्यांच्या अभ्यासावरून या काळात विदर्भात मित्रवंशीय आणि भद्रवंशीय अशा दोन राजवंशाची सत्ता असल्याचे दिसते.[11] या वंशाची अधिकांश नाणी वर्धा जिल्ह्यात पवणार येथे सापडली आहेत. हे दोन्ही वंश विदर्भात एकाच वेळी राज्य करीत होते. नागपूर जिल्ह्यातील अडम येथे झालेल्या संशोधनात दमभद्रची तांब्याची नाणी मिळाली आहेत हे राजे सातवाहन आणि शुंग यांच्यातल्या एका शतकाच्या कालावधीत होऊन गेले असावेत.

सातवाहकालीन नागपूर

मित्र व भद्र राजवंशाच्या एका शतकाच्या सत्तेनंतर विदर्भ नागपूर प्रदेशात सातवाहन वंशाचे राज्य उदयास आले.[12] सातवाहन वंशीय राजा सिमुक प्रथम याने विदर्भ नागपूर प्रदेशात आपली सत्ता प्रस्थापित केली. या राज्याची नाणी विदर्भात वर्धा जिल्ह्यात पवनार येथे सापडले आहेत.[13] सातवाहन राजा सातकर्णीच्या राज्यात विदर्भ नागपूरचा प्रदेश समाविष्ट होता. नागपूर जिल्ह्यातील अडम हे ठिकाण सातवाहन काळातील महत्त्वाचे मोठे व्यापारी केंद्र होते. यावेळी सातवाहनांचे मांडलिक म्हणून काही महारठि विदर्भात राज्य करीत असल्याचे पुरावे मिळतात.[14] नागपूर पासून जवळ असलेल्या चंदाला नावाच्या जंगलामध्ये सातवाहन काळातील एक पानपोई मिळाली आहे यातील दगडावर दोन लेख कोरलेले आढळतात. त्यावरून ही पानपोई चंद्रपूर जिल्ह्यातील भांदक भद्रावती आणि इलाहाबाद उत्तर प्रदेशातील कोशांबी या मार्गाने व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी बनवण्यात आली होती.असे दिसते.[15]

पश्चिमी क्षत्रप आणि नागपूर प्रदेश

सातवाहना नंतर नागपूर विदर्भ प्रदेशांमध्ये पश्चिमी क्षत्रपांनी आपली सत्ता स्थापन केल्याचे उल्लेख आहेत वैनगंगेच्या तीरावर महाक्षत्रप कुमार रुपियम्म याचा प्रतिमायुक्त स्तंभ मिळालेला आहे. रुपिअम्म हा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

नहपानाचा समकालीन होता असे या स्तंभावरून दिसून येते. सम्राट कनिष्काने कुमार रुपीअम्मा याची या प्रदेशावर नियुक्ती केली होती.पवनी हे रुपीअम्मच्या राजधानीचे ठिकाण होते. यावरून या क्षेत्रात पश्चिम क्षत्रपांची सत्ता होती असे म्हणता येते.[16]

**वाकाटक कालीन नागपूर**

इ. स. वी सनाच्या तृतीय शतकाच्या शेवटी नागपूर विदर्भ प्रदेशात वाकाटकत् नृपती प्रथम प्रवरसेनाने आपली सत्ता प्रस्थापित केली.[17] प्रवर सेनाची राजधानी पुरिका किवा चतका असावी. त्याने आपल्या राजधानीचा विस्तार विंध्य पर्वतापासून ते दक्षिण विदर्भापर्यंत केला होता.त्याने साठ वर्ष राज्य केले. मुलगा सर्वसेनाने याच वंशाची दुसरी शाखा वत्सगुल्म शाखेची स्थापना अकोल्यात केली. वाकाटकांच्या तिसऱ्या पिढीच्या सुरवातीला या वंशाची राजधानी नागपूर जिल्हात नंदिवर्धन वर्तमान नगरधन ही होती.[18] प्रवरसेनानंतर गादिवर आलेल्या रुद्रसेनाचा उल्लेख देवटक शिलालेखात भारशिव महाराज भवनाग राजाचा दोहित्र असा आढळतो (पुत्रीचा पुत्र). भावनाग हा नाग वंशाचा शक्तिशाली राजा होता. रुद्रसेनाने वीस वर्ष राज्य केले. त्यानंतर मुलगा पृथ्वीसेन प्रथम गादीवर आला.[19] पृथ्वीसेनाचा मुलगा आणि उत्तराधिकारी द्वितीय रुद्रसेनाचा विवाह प्रभावती गुप्ता हिच्याशी झाला प्रभावती गुप्ता ही समुद्रगुप्ताचा मुलगा द्वितीय चंद्रगुप्ताची मुलगी होती. द्वितीय रुद्र सेना च्या निधनानंतर ज्येष्ठ पुत्र दिवाकर सेनाला गादीवर बसून प्रभावती गुप्ताने तेरा वर्षे राज्यकारभार केला दिवाकर सेनानंतर भाऊ दामोदर सेनाने आपल्या कारकीर्दीत राजधानी प्रवरपूरहून पवनार येथे हलवली होती.[21] मांढळ ताम्रपटात या विषयीची माहिती मिळते.[22] नंदीवर्धन प्रवरपुर शाखेचा पृथ्वी सेन हा शेवटचा वाकाटक शासन होता.नंतरच्या काळात वाकाटक साम्राज्याच्या विशाल प्रदेशावर वाकाटकांच्या मांडलिक राजवंशाची सत्ता स्थापन झाली. हा काळ विदर्भाच्या इतिहासातील सुवर्णकाळ होता.[23] वाकाटकांच्या नंतरच्या विदर्भ नागपूरच्या इतिहासाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. विष्णूकुंडी प्रकारच्या अनेक तांब्यांच्या नाण्यांवरून या प्रदेशात यावेळी आंध्र प्रदेशातील विष्णूकुंडी या प्रभावशाली राजाची सत्ता होती. नंतरच्या काळात महेश्मतीच्या कलचुरी राजघराणे प्रस्थापित झाले.[24] कलचुरी राज्याची सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी आणि चालुक्य राजा द्वितीय पुलकेशनच्या आधी विदर्भातल्या या प्रदेशात काही दशके मुंडपुत्रवंशी राजाचे अधिपथ्य असल्याचे मल्हारा ताम्र पत्रातून दिसून येते.[25] द्वितीय पुलकेशिन नंतरच्या उत्तराधिकाऱ्यांपैकी एकाचाही लेख विदर्भात आढळत नाही.चातालुक्याच्या नंतर मान्यखेडच्या राष्ट्रकुटांचे साम्राज्य विदर्भ नागपूर प्रदेशावर स्थापित झाले. राष्ट्रकुटांचे अनेक लेख मिळाले आहेत या राजवंशामध्ये कृष्ण तिसरा याची कारकीर्द प्रभावी होती.[26] यानंतर कल्यानीचे चालुक्य आणि परमारांनी सुद्धा नागपूर प्रदेशात आपले वर्चस्व निर्माण केले.परमार राजा नरवर्मा याचा इ स 1104-05 चा एक लेख नागपूर संग्रहालयात आहे.[27]

**देवगिरीचे यादव घराणे**

पाचवा भिल्लम आणि त्याचा मुलगा जैत्रपाल यांनी कल्याणीच्या चालुक्याची सत्ता झुगारून बाराव्या शतकात देवगिरी येथे यादव वंशाची स्थापना केली जत्रपालाचा मुलगा सिंघम यांनी मोठ्या प्रमाणात आपले साम्राज्य विस्तारले. त्याचा सेनापती खोलेश्वर हा विदर्भाचा होता याच खोलेश्वराने चंद्रपूरच्या परमार राजा भिमाचा पराभव केला होता.[28] कृष्णाच्या नंतर त्याचा मुलगा रामदेव आणि पुतण्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

आमन देव यांनी देवगिरीवर काही काळ राज्य केले.[29] रामदेव हा यादव कुळातील सर्वात शेवटचा स्वतंत्र राजा होता त्याने आपला विश्वासू हेमाद्री च्या मदतीने नागपूर सहित पूर्ण विदर्भावर यादवांची सत्ता प्रस्थापित केली होती. याच रामचंद्राचा खंडित लेख रामटेक येथील लक्ष्मण मंदिराच्या भिंतीवर आहे.[30] रामचंद्राने इ स 1310 पर्यंत स्वतंत्र राज्य केले. रामचंद्रांनंतर आलेल्या शंकरदेवाला कर न देण्याचे कारण देऊन अल्लाउद्दीन खिलजी ने सेनापती मलिक काफुर कडून ठार केले. यानंतर विशाल यादव साम्राज्य दिल्ली सल्तनतच्या अधीन आले.[31]

**गोंड राजवटीमध्ये नागपूर प्रांत**

नागपुरात भोसल्यांचा उदय होण्यापूर्वी नागपूर सह मध्य प्रांतात सर्वत्र गोंडाची सत्ता होती. हा संपूर्ण प्रदेश मोगल साम्राज्याचा भाग असला तरी या भागावर गोंड राजाचा अंमल होता. हे गोंड राजे मोगलांचे सार्वमत्व स्वीकार करून राज्यकारभार करीत होते.[32] गढामंडला, देवगड, चांदा, आणि खेरला ही गोंडवनातील गोंडांची चार प्रमुख केंद्र होती. देवगड आणि चांदा यांच्या गोंड राजवटीने महाराष्ट्रातील नागपूरचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. नागपूरची निर्मिती ही गोंड राज्याची महाराष्ट्राला लाभलेली फार मोठी देणगी आहे. गोंडाची प्रमुख सत्ता असलेल्या गढा येथील गोंड राजवटीला उतरती कळा लागल्याच्या सुमारास देवगड येथे गोंड घराण्याचा उदय झाला.[33] गोदावरी खोऱ्यातील एका पाटलाच्या जाटबा नामक कर्तबगार मुलाने[34] इ. स. 1580 मध्ये देवगडच्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्यावेळी मुघल सम्राट अकबराने देवगडास येऊन जाटबाचा गौरव केला होता.[35] अकबराच्या वेळेस हा महत्वाचा संस्थानिक होता. जाटबाने आपल्या विस वर्षाच्या राजवटीत अनेक वास्तू बांधल्या, स्वतःची नाणे पाडली.[36] आणि दक्षिणेस नागपूर पर्यंत आपला अंमल वाढवून राजापूर बारसा येथे एक किल्ला बांधला.[37] जातबा नंतर दलशहा, कोकशहा, आणि दुर्गशहा यांनी इ स 1648 पर्यंत राज्य केले. पुढे खंडणी न देण्याच्या कारणावरून शहाजहानने देवगड आणि राजापूर बारसावर आक्रमण करून कोकशहाचा पाडाव केला.[38]

**नागपूर राज्याची स्थापना**

देवगड आणि राजापूर बारसावर खानदौरानला आक्रमण करायला लावून शहाजहानने कोकशहाचा पाडाव केल्यानंतर आलेल्या केसरीशहावरही औरंगजेबाने आक्रमण करून देवगड पुन्हा ताब्यात घेतले. त्यानंतर आलेल्या गोंडाचा इतिहास स्पष्ट उपलब्ध नाही परंतु मोगल दरबारच्या कागदपत्रावर असे दिसून येते की देवगडचा राजा आपल्या दोन भावांसह औरंगजेबाची मर्जी मिळवण्यासाठी आणि मुस्लिम धर्म स्वीकारून राज्य परत मिळवण्यासाठी आपल्या दीनदारशहा आणि महिपतशहा या आपल्या दोन भावासह इस्लामशहा दिल्लीला गेल्याची माहिती आहे.[39] औरंगजेबाने काही अटीनुसार महिपतशहाला देवगडच्या गादिवर बसवले.महिपतशहाने धर्मांतर करून मुस्लिम धर्म स्वीकारला.औरंगजेबाने त्याला बख्त बुलंद हे नाव दिले.नागपूरच्या जडण घडणीत सिंहाचा वाटा असलेल्या बख्तबुलंदने इ. स. 1686 पासून आपल्या राज्यकारभाराला सुरुवात केली.[40] गोंड राजांमध्ये बख्त बुलंद सारखा प्रभावी आणि धडाडीचा दुसरा राजा नव्हता. त्याने नागपूर शहराचा विकास करून शहराला राजधानीचा दर्जा दिला आणि इथूनच कारभार पाहू लागला.सत्ता हाती येतात त्याने शासकीय आणि महसूल विषयक सुधारणा करून नागपूर राज्याची आर्थिक घडी नीट बसवली होती.[41] राज्याचे उत्पन्न वाढत असतानाच उत्पन्नाचा मोठा भाग महसूल म्हणून मुघलांना


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

द्यावा लागत असल्याने औरंगजेब आणि बख्त बुलंद यांच्यात वाद निर्माण झाला.औरंगजेबाने बख्तबुलंदला पदच्युत करून दिलदारशहास गादी दिली.[42] बख्तबुलंदला चार महिने नजर कैदेत ठेवले. याचा फायदा घेत चंद्रपूरच्या किसनसिंगने आक्रमण करून नागपूर बोरी हा प्रदेश ताब्यात घेतला.[43] अशातच बख्तबुलंद मुघलांच्या छावणीतून पळाला आणि वऱ्हाडात जाऊन त्याने देवगडची गादी मिळवण्यासाठी प्रयत्न केले. किसनसिंहाचा मुलगा आणि चांद्याचा राजा वीरशहा याला ठार करून बख्तबुलंद याने देवगड आणि नागपूरचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. राजापूर वारसाच्या बारा वाड्या एकत्र करून त्याने 1702 मध्ये नागपूर राज्याची उभारणी केली.नागपूर शहराचे नागपूर हे नाव यानेच कायम केले.[44]

राज्य उभारण्याच्या कार्यात त्यांनी जी धडाडी दाखवली आणि एक कार्यक्षम प्रशासक म्हणून त्यांनी जे निर्णय घेतले त्याला गोंड इतिहासात तोड नाही. बख्तबुलंद यांनीच खरे तर आजच्या नागपूरची पायाभरणी केली. नंतर मुलगा चांद सुलतान हा नागपूरचा सर्व सत्ताधीत झाला त्याने इसवी सन 1738 पर्यंत राज्य केले. आपल्या कार्यकर्तृत्वाने चांद सुलतानाने नागपूरच्या विकासात भर घातली. नागपूर राज्याचे महत्त्व वाढवले. औरंगजेबाच्या मृत्यूमुळे मराठी सत्ता नव्या जोमाने पुढे आली.नागपूर परिसरात नव्याने प्रस्तापित झालेल्या नागपूरकर भोसल्याननी सुद्धा या संधीचा फायदा घेत गोंड साम्राज्य आपल्या वर्चस्वाखाली आणण्यासाठी प्रयत्न केले. चांद सुलतानच्या मृत्यूमुळे ही संधी भोसल्यांपुढे आपसूकच चालून आली.

**नागपूरकर भोसल्यांच्या राजवटीतील नागपूर**

महाराष्ट्रात मराठ्यांच्या राजवटीत नागपूरकर भोसले यांचे स्थान विशेष उल्लेखनीय आहे. नागपूरकर भोसले घराण्यात पहिला रघुजी हा शूर आणि पराक्रमी होता. त्याने स्वतःच्या बळावर नागपूर मध्ये भोसले राज्यांची सत्ता स्थापन केली.वऱ्हाडात रघुजींची सत्ता स्थिर होत असताना देवगडचा गोंड राजा चांद सुलतान मरण पावला. चांद सुलतानच्या मुलांना बाजूला सारून त्याचा अनौरस पुत्र वलीशः शहाने सत्ता बडकाविली. या परिस्थितीत चांद सुलतान ची राणी रतनकुवर हिने आपल्या अल्पवयीन मुलांच्या मदती साठी रघुजीला विनंती केली. चांद सुलतान ची मुले अकबरशहा आणि बुऱ्हाणशहाच्या मदतीला धावून येत राहू देणे देवगड सारी करून पोलिसाला पराभव केला देवगड राज्याचा एक इतिहास भाग आणि खर्च म्हणून दहा लाख रुपये दिले.[46] अशा रीतीने रघुजीच्या हाती नागपूर,भंडारा, रामटेक चा भाग आला. रघुजींने आपल्या राज्याचे केंद्रस्थान वऱ्हाडातून नागपूरला आणले.सेनासाहेब सुभा पदाची वस्त्रे साताराचे छत्रपती शाहू कडून घेउन त्याने नागपुरला आपली राजधानी केली.[47] भोसले घराण्यातील एकूण सात राजांनी नागपूर राज्यावर जवळपास 126 वर्ष राज्य केले.तिसऱ्या रघुजीच्या मृत्यूनंतर नागपूर राज्य खालसा (1854) होऊन ब्रिटिशांचा अमल सुरू झाला.यानंतर कोर्ट ऑफ वार्ड कडे जबाबदारी सोपवून चौथे रघुजीच्या कारकीर्दीत देश स्वतंत्र झाल्यानंतर संस्थान विलीन करून राजेशाही समाप्त करण्यात आली.[48]

**उपसंहार**

नागपूरला वैभवशाली अशी ऐतिहासिक प्राचीन पार्श्वभूमी लाभलेली आहे.या ठिकाणी पुरापाषाण कालीन मानवी वस्तीचे अवशेष मिळाली आहेत. नागपुरला नागांचे राज्य होते. नाग लोकांनी या परिसरात मोठ्या प्रमाणात वस्ती केली होती. त्यांच्या वरूनच या शहराला नागपूर आणि येथून वाहणाऱ्या नदीला नाग नदी असे नाव पडले.नागपूरची ऐतिहासिकता ही पुरा पाषाण युगांपासून ते सातवाहन राजवटीपर्यंत जाताना दिसून येते. नंद साम्राज्या पासून ते मौर्य गुप्त कलचुरी शुंग वाकाटक सातवाहन राष्ट्रकुट गोंड भोसल्यांनी या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

प्रदेशावर राज्य करीत नागपुरच्या वैभवात वाढ केलेली आहे. गोंड राजा बख्त बुलंद याने नागपूर राज्याची पायभरणी करून त्यानेच या शहराचे नागपूर हे नाव कायम ठेवले. नागपुरच्या भोसल्यांनी आपल्या कार्य आणि कर्तुत्वाने नागपुरच्या सौंदर्यात भर घातली. ब्रिटिशांनी नागपूरचे राज्य खालसा करेपर्यंत भोसल्यानी नागपूर राज्याचा सांभाळ केला.तिसऱ्या रघुजीच्या मृत्यू नंतर इ स 1854 मध्ये राज्य खालसा करण्यात आले. आणि चौथे रघुजी भोसलेंच्या कार्यकाळात नागपूर संस्थान स्वतंत्र भारतात विलीन करण्यात येऊन राजेशाही समाप्त करण्यात आली.

**संदर्भग्रंथ सूची**

1. लोखंडे भालचंद्र (संपा), डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे प्रथम धम्म प्रवचन, ऑल इंडिया समता सैनिक दल, उंतखाना दहीपुरा,नागपूर 2015 पृष्ठ 3
2. नारनवरे चंद्रभान किसन, नागपूर नागांचा प्राचीन इतिहास आणि बौद्ध भिक्खू संघाची संघरामगिरी, रामटेक सिद्धार्थ नगर,नागपूर 1981 पृष्ठ 5
3. डॉ. अंधारे भा.रा. नागपूरचे भोसले (1730 ते 2002), हिंदी मराठी प्रकाशन, धनवटे चेंबर्स, सीताबर्डी नागपूर 2018 पृष्ठ 5 (प्रस्तावना)
4. Indian Archaeology a Review 1979-80 Edited by Debala Mitra Director Genaral Archaeology survey of India, New Delhi 1983 pg. 104
5. Indian Archaeology a Review 1961-62 Edited by A Ghosh, Director Genaral Archaeology survey of India, New Delhi 1964
6. B. U. Naik, N. C. Ghosh Ed. S R Rao Felitation Calum, Adam and Index to vidarbh Archaeology New Trends in Indian art and Archaeology Aditya pub.New Delhi 1992 pg 69
7. Deo S B ,Takalghat and khapa Excavation pub. Nagpur University 1970
8. Alexander Cunningham,corpus inscription indicarum 1877,govt print calcutta. pg 28.
9. Shastri Ajay Mitra, Early History of Deccan problem and perspective Pub Sundeep Prakashan 1987 Delhi Pg 10
10. Shastri Ajay Mitra,pri satvahana and Satvahana coins of Deccan Numismatic society of India vol 44 1982
11. Shastri Ajay Mitra and Gupt Chandrashekhar ,Mitra and Bhadra Coins from vidarbha, murudhar arts.Banglore v 1 pg 9 lot 58
12. Gupt chandrashekhar ,silling of Satyabhadra numismatic digest vol 6 Pg 93
13. mirashi v v indological studies vol 3 Nagpur 1962 pg 34
14. Deo S B, Chatte S B A new maharathi Coins from journal of the numismatic society of India vol 3 pg 236
15. Gupt chandrashekhar,chandala of Inscription journal of the epigrafic Society of India vol 2 pg 116
16. Dr. Chhabra B C,Rao N L Ed. Epigraphica Indica vol 27 1947-48 Pub.by Manager of publication. Delhi 1956 pg 201


Copyright © | JET Network, All Rights Reserved

17. Shastri Ajay Mitra,some aspects of Personal names in the vakatakas Inscription journal of the Oriental institute vol 33 pg 257
18. मिराशी वा वी, वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ नागपूर विद्यापीठ, नागपूर 1957 पृष्ठ 185 नागपूर विद्यापीठ, नागपूर 1957 पृष्ठ 185
19. Shastri Ajay Mitra,the puranik king King prabhuti some reflection riaprezing Gupt History for Ed S R Goyal and Chhabada New Delhi 1992 pg 149
20. शास्त्री अजय मित्र व गुप्त चंद्रशेखर , द्वितीय रुद्रसेणाचा मांढळ ताम्रपत्र लेख, संशोधनाची क्षितिजे डॉ वी भि कोलते अमृत महोत्सवी ग्रंथ, नागपूर पृष्ठ 203
21. शास्त्री अजय मित्र दि एज ऑफ दि वाकाटकाज् आर्यन बुक इंटरनॅशनल ,1992 हर्मन पब्लिशिंग हाउस न्यू दिल्ली पृष्ठ 203
22. Shastri,Hirananda Ed.Epigraphica indica vol 19,1927-28 Archaeological survey of India Janpath New Delhi pub branch Bombay britanica press.pg 100
23. शास्त्री व गुप्त संशोधनाची क्षितिजे पृष्ठ 223
24. mirashi v v , inscription of the kalachuri Chedi Era vol 1 govr epigraphist of India 1955 pg 611
25. Shastri Ajay Mitra,the malhara plets of Aditya Raj a riaprezal journal of the Epigraphic society of India vol 4 pg 30
26. Hultzsch E Ed.Epigraphica indica vol 4 1896-97 calcutta Bombay education society press pg 196
27. Sircar D C Ed. Epigraphica Indica vol 32 pg 112 1957
28. Burgess,jas Ed Epigraphica Indica vol 2 1892 pg 140
29. Chakrawvarti N P, Ed Epigraphica Indica vol 25,1939 pg 199
30. बाबगावकर म श, रामदेवराय यादवांच्या पत्रांचे व स्वशूरांचे नाव - विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक 1970 नागपूर पृष्ठ 161
31. वही पृष्ठ 161
32. काळे या मा नागपूरकर भोसल्यांचा इतिहास दु आवृत्ती नागपूर 1936
33. वही पृष्ठ 13 गोंडाची कारकिर्द
34. महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर जिल्हा नागपूर भाग 1 पृष्ठ 100
35. डॉ पाठक अरूनचंद्र संपा.महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, नागपूर जिल्हा भाग 1 दार्शनिक विभाग मुंबई 2005
36. Eure.chatterton,D D Bishap,The story'of Gondwana,sir esaaac pitmon and son Ltd New York Melbourne 1916 pg 25
37. काळे या मा नागपूरकर भोसल्यांचा इतिहास पृष्ठ 13
38. The story'of Gondwana pg Deogad note pg 17
39. महाराष्ट्र राज्य गझेटीअर नागपूर जिल्हा भाग 1 पृष्ठ 139
40. वही पृष्ठ
41. सेतू माधवराव पगडी अनु.मोगल दरबारची बातमीपत्रे, सरकार जदुनाथ,भाग 1 पृष्ठ 145 महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ नवीन प्रशासन भवन, मुंबई


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

42. सरकार जदुनाथ,विदर्भातील ऐतिहासीक लेखसंग्रह भाग 1 पृष्ठ 7
43. सेतू माधवराव पगडी,मोगल दरबारची कागदपत्रे पृष्ठ 145
44. पूर्वोक्त, महाराष्ट्र राज्य गझेटीअर पृष्ठ 143
45. पुर्वोक्त, काळे या मा.नागपूरकर भोसल्यांचा इतिहास पृष्ठ 15
46. महाराष्ट्र राज्य गझेटीअर पृष्ठ 146
47. पूर्वोक्त, काळे या मा नागपूरकर भोसल्यांचा इतिहास
48. पूर्वोक्त पुरवणी ...पृष्ठ 366


Copyright © | JET Network, All Rights Reserved